बीड । जालना । छ. संभाजीनगर । पुणे । अहमदनगर । यवतमाळ | आर. एन. आय. एमएएच /एमएआर / २०१४/ ५८०९० | शनिवार दि. २६ एप्रिल २०२५ | वर्ष १० वे | अंक -१२ | पाने ४ | किंमत २ रु

Beed / Jalna/ Chatrapati Sambhajinagar | RNI : Regd.No.MAHMAR/2014/58090 | Saturday Date: 26 April 2025 | 10 th Year | 12 th Paper | Pages : 4 | Price - 2 Rupees




महाराष्ट्राचा महानायक

बीडचा

# लोकनायक

संपादक - भारत गायकवाड

मुळे गुरुजी अँन्ड असोसिएट्स
मुळे गुरुजी अँन्ड असोसिएटस
9405071118

# अधिकाऱ्यांचा सत्कार करणे आणि त्यांनी सत्कार स्वीकारणे दोन्ही गैर

## कामाला प्राधान्य दिले पाहिजे - अँड. अजित देशमुख

**जनता नवीन आलेल्या अधिकाऱ्यांचा सत्कार करते. प्रतिनिधिक स्वरूपात एखादा दुसरा सत्कार होण्यास हरकत नाही. मात्र शेकडो सत्कार करणं आणि शेकडो सत्कार स्वीकारणे, हे चुकीच आहे. जनतेने आपले काम करावे आणि अधिकाऱ्यांनी आपले काम करावे, हा नियम आहे. त्यामुळे सत्कार स्वीकारणे चूक आहे तर दुसरीकडे सत्कार कोण करते, यालाही महत्त्व आहे. अलीकडच्या काळात मोठे अधिकारी आणि मोठ्या पुढार्यांसोबतचे फोटो प्रकाशित झाल्यानंतर जनतेने यावर चिंतन केले आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांचा तुम्ही देखील सत्कार करू नका, असे आवाहन जन आंदोलनाचे विश्वस्त अँड. अजित एम. देशमुख यांनी केले आहे.अनेक जण सत्कार करतात. अनेकांचे सत्कार ते काय उद्योगधंदे करतात, हे माहीत असतानाही जाणीवपूर्वक स्वीकारले जातात. त्याचा समाजावर वेगळा प्रभाव पडत असतो. आम्ही प्रशासना बरोबर आहेत. प्रशासन आम्ही सांगतो ते ऐकत, अशा पद्धतीचा निरोप सत्काराच्या आणि गप्पागोष्टींच्या माध्यमातून ते समाजापर्यंत पोहोचवत असतात.सत्कार करणारे सर्वच गैर आहेत, असे नाही. चांगले लोक देखील आहेत. पण सगळ्यांनी आपल्या भावनांना आवर घालून आपले काम करायला हवे. ग्रामीण भागातून एखादा येऊन सत्कार करत नाही. तर सत्कार करणाऱ्यांमध्ये अनेक जण लाभार्थी असतात. आणि त्यांचे फोटो नंतर काही कालांतराने गैर कारभारामुळे प्रसारित होतात.**

**लोकनायक वृत्तसेवा -** या बाबी अधिकाऱ्यांच्या दृष्टीने योग्य नाहीत.नुकतेच बिरूदेव यांनी आय.ए.एस. परीक्षा पास झाल्यानंतर मित्रमंडळी आणि जनतेला आवाहन केले की, त्यांनी सत्कारासाठी बुके आणू नये. बुक आणावे. ही बाब अधिकाऱ्यांनी लक्षात घेतली पाहिजे. आपल्या सत्कारासाठी कोण आले, त्यांचे धंदे काय आणि त्याच बरोबर त्यांनी आजपर्यंत काही गैरव्यवहार केलेला आहे का ? याची चाचपणी संबंधित अधिकाऱ्याने नंतर केली पाहिजे. त्या गैर



कारभारावर आळा घातला पाहिजे. मात्र असे होत नाही.बीड जिल्ह्यातील प्रशासन जनतेसाठीचे राहिलेले नाही, हे अनेक वेळा दिसून येते. पुढारी आणि अधिकारी यांचे संगणमत झाल्याने अनेक मोठमोठे घोटाळे बीड जिल्ह्यात झालेले आहेत. आमच्यामुळे अनेक घोटाळ्यात कारवाई झाली. अनेक घोटाळे आम्ही हाणून पाडले. नूतन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी या संदर्भातली माहिती घेतली पाहिजे.आमच्या बोलण्याचा अनेकांना राग येईल. मात्र आम्ही सार्वजनिक रित्या सर्वांना बोलत नाहीत. तर गुन्हेगारी प्रवृत्तीच्या अनेक लोकांनी सत्काराच्या माध्यमातून अनेकांना फसवल्याचे स्पष्ट झालेले आहे. त्यामुळे अशा गुन्हेगारांना अधिकाऱ्यांनी रोखले पाहिजे. म्हणून आम्ही या विषयावर बोलत आहोत.यात आणखी एक महत्त्वाचा मुद्दा असा की, अधिकारी सामान्य माणूस म्हणजेच साधारण कपडे घालून आलेला माणूस सत्कारासाठी आल्यानंतर उठत नाहीत. पांढरे शुभ्र कपडे असलेल्या माणसांसाठी ते उठून सत्कारासाठी सज्ज होतात. हा देखील सामान्य जनतेच्या मनावर आघात करणारा एक प्रश्न आहे. त्यामुळे सामान्य जनतेने देखील सत्काराला जाण्याची आवश्यकता नाही.वास्तविक पाहता सेवा नियमाप्रमाणे **पान २ वर**

# गोदावरी नदीपात्रातून वाळू चोरणाऱ्या वाळू माफियाला अटक

**लोकनायक वृत्तसेवा -** तालुक्यातील मौजे शहागड गावालगत असलेल्या गोदावरी नदीपात्रातून एक वाळू माफिया त्याच्या मालकीच्या ट्रॅक्टर मध्ये अवैध वाळू भरीत असल्याची माहिती गोंदी पोलीस ठाण्याचे सपोनि.श्री आशिष खांडेकर यांना मिळाली असता त्यांनी डी.वाय.एस.पी.श्री विशाल खांबे यांना माहिती देऊन मिळालेल्या माहितीची खात्री करून शहागड येथील महादेव मंदिराजवळ गोदावरी नदीपात्रातून अवैध वाळू भरुन वाळू वाहतूक करणारा ट्रॅक्टर चा चालक मालक हनिफ शेख वय २८ वर्षे रा.शहागड या वाळू माफियाला पकडून त्याच्या ताब्यातून ट्रॅक्टर व ट्रॉली आणि वाळू असा ५०५०००/- पाच लाख पाच हजार एकूण ऐवज जप्त करुन ट्रॅक्टर चालक मालकावर गुन्हा दाखल करण्यात आला पुढील तपास सपोनि.**पान २ वर**



# माजलगावात आणखी एका क्रेडीट सोयायटीत घोटाळा

संस्थेत जमा झालेल्या ठेवीच्या नोंदी व कर्ज रकमेच्या नोंदी संगणकावर न करता बनावट दस्तऐवज करून ठेवीदारांना ठेऊन पावत्या व कर्जदारांना बेबाकी प्रमाणपत्र दिल्या. या प्रकरणी मराठवाडा अर्बन को-ऑप क्रे डीट सोसायटीचे संचालक मंडळ व कर्मचारी, धनदांडगे मालमत्ता खरीददार व या सोसायटीच्या लेखा-परीक्षकासह २४ जणांवर माजलगाव शहर पोलीस ठाण्यात लेखापरीक्षा वर्ग २ त्यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोसायटीचे फेर लेखापरीक्षण केले माजलगाव शहरातील मोंढा भागात असलेल्या मराठवाडा अर्बन कोऑप क्रेडीट सोसायटीचे १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२३ चे फेर लेखापरीक्षण विशेष लेखा परीक्षक वर्ग २ सहकारी संस्थेचे सतीश काकासाहेब पोकळे यांनी केले. त्यांनी याचा अहवाल वरिष्ठांना सादर केला. या अहवालात असे नमुद केले आहे की, समृद्ध मराठवाडा मल्टीस्टेट व्हिकल सर्विसेस को-ऑप सोसायटी या नावाने कॅश क्रेडिट ९ कोटी ३९ लाख ७० हजार ८२१ मुदत ठेवीं मधील अपहार श्रीराम मच्छिंद्र बहिर ६ लाख, सुहास संपत जाधवर ३० लाख, कर्ज वितरणातील अपहार व गैरव्यवहार ५ कोटी ५० लाख रूपये केला. असा सर्व मिळुन १५ कोटी २५ लाग ७० हजार ८२१ रूपयांचा समावेश आहे. या अपहारास जबाबदार असलेल्या २४ जणांबाबत तक्रारीत उल्लेख करण्यात आला आहे. या प्रकरणी मराठवाडा अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटीचे अध्यक्ष सतीश गंगाधर सावंत, गणेश त्रिंबकराव शेळके, महिंद्र मनमोहन मानधने, विश्वंभर पांडुरंग शिंदे, शिवाजी लक्ष्मण गडदे, अनिता पृथ्वीराज होते, सुनिता भास्करराव खटले, सुमित बाळकृष्ण भावसार, योगेश एकनाथ घुले, पोपट शिवाजी आवाड (वरील सर्व संचालक), मुख्य कार्यकारी अधिकारी किशोरी सतीश सावंत व गजानन विठ्ठलराव डासाळकर, व्यवस्थापक अमोल सुखदेव अंधारे, रविकिरण मधुकर दहिवाळ, भाग्यश्री गगानन डासाळकर, गुलाबाई रूपाजी अंधारे, अंजली अमोल अंधारे, अशोक आता गिरी (वरील सर्व संस्थेचे कर्जदार), लेखापरीक्षक एस.बी. गायकवाड व किरण कमलाकर सावजी, समर्थ मराठवाडा मल्टीस्टेट व्हिकल सर्विसेस **पान २ वर**

# तहसीलदार योगिता खटावकर यांचे शेतकऱ्यांना अवाहन

**लोकनायक वृत्तसेवा -** घनसावंगी तालुक्यातील शेतकऱ्यांनी समस्त महाजन ट्रस्ट, मुंबई यांच्या कडून मिळणाऱ्या मोफत पोकलेन मध्ये लोकसहभागातून डिझेलची व्यवस्था करून आपलं गावं जलसमृद्ध करण्यासाठी प्रयत्न करावा.आज गुरुवार दि.२४/०४/२०२५ रोजी दुपारी ५:३० वा घनसावंगी तालुक्यात शेवगळ गावातील गट क्र १७० शिवारात समस्त महाजन ट्रस्ट, मुंबई यांच्या कडून मोफत पोकलेन उपलब्ध करुन तहसीलदार श्रीमती योगिता खटावकर आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत नारळ फोडून नाल्याचे खोलीकरणाच्या कार्याला शुभारंभ करण्यात आले. सन २०१७ मध्ये याच नाल्याचे खोलीकरण केल्यामुळे आज रोजी टँकर बंद असून शेतकरी दोन पिके घेत आहेत.

गावात बैठक घेऊन ग्रामस्थांशी चर्चा करुन जलसंधारणाची कामे हाती घेण्याचा निर्णय घेऊन मोफत मिळणाऱ्या पोकलेन मशीन मध्ये डिझेल टाकण्याचा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते कांतावर सोनुने, ग्रामपंचायत सदस्य शंकर लोंढे, माजी उप सरपंच भरत अटकळ, भास्कर लोंढे, बाळासाहेब लोंढे, अंगत अटकळ, केशव लोंढे, प्रभाकर लोंढे, भागवत लोंढे, योगेश लोंढे, विकास लोंढे,समाधान लोंढे, सौरभ लोंढे, प्रसाद अटकळ, वसंतराव लोंढे, पंढरीनाथ अटकळ, रामा दहिवाळ, चिरंजीव आदिराज अटकळ सामाजिक कार्यकर्ते महादेव मते, नरेंद्र जोगड आणि देवा चित्राल आदींची उपस्थिती होती.

# पहलगाम दुर्घटनेतील जखमी व कुटुंबियांना पालिका रुग्णालयाचा मानसिक आधार

**लोकनायक वृत्तसेवा -** पहलगाम येथे नुकत्याच झालेल्या दुर्घटनेनंतर जखमी व त्यांच्या कुटुंबियांसाठी मुंबई महानगरपालिकेच्या टोपीवाला नॅशनल मेडिकल कॉलेज आणि बीवायएल नायर हॉस्पिटल, गोरधनदास सुंदरदास मेडिकल कॉलेज आणि केइएम हॉस्पिटल, लोकमान्य टिळक म्युनिसिपल मेडिकल कॉलेज आणि लोकमान्य टिळक म्युनिसिपल जनरल हॉस्पिटल तसेच हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मेडिकल कॉलेज आणि आर एन कूपर हॉस्पिटलमध्ये मानसिक आरोग्य सेवा विविध पातळ्यांवर उपलब्ध करून दिल्या आहेत.मुंबईतील या चार प्रमुख महापालिका रुग्णालयांमध्ये सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत समुपदेशन, तीव्र तणावाचे मूल्यमापन, पीटीएसडी (पोस्ट ट्रॉमॅटिक स्ट्रेस डिसऑर्डर) ची शक्यता, औषधोपचार **पान २ वर**

# मौजे कोठाळा येथे श्रीमती नूतन दीदी देसाई आणि ग्रामस्थांच्या हस्ते ओढ्याच्या खोलीकरणाला प्रारंभ

**लोकनायक वृत्तसेवा -** पोकलेन मशीन मोफत उपलब्ध करून दिल्याबदल सरपंच भरत त्रिंबक गुळवणे यांनी समस्त महाजन ट्रस्ट मुंबई यांचे मानले आभार गोदावरी नदी काठा जवळ असलेल्या मौजे कोठाळा गावात समस्त महाजन ट्रस्ट, मुंबई यांच्या कडून मोफत पोकलेन मशीनी उपलब्ध करून ओढ्याचे खोलीकरणाच्या कार्याला समस्त महाजन ट्रस्ट मुंबई चे श्रीमती नूतन दीदी देसाई आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत




नारळ फोडून ओढ्याचे खोलीकरणाच्या कार्याला शुभारंभ करण्यात आले.मौजे कोठाळा गावातील बोअरवेल आटले, विहिरीतील पाणीही आटले असून दरवर्षी पाण्याची टंचाईला सामोरे जावे लागत असल्यामुळे याही वर्षी पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत म्हणून गावात बैठक घेऊन ग्रामस्थांशी चर्चा करुन**पान २ वर**



**लोकनायक वृत्तसेवा -** राष्ट्रवादी काँगेस पार्टी जिल्हा अध्यक्ष व माजी आमदार अरविंद चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त मिर्ज़ा अनवर बेग मित्र परीवाराच्या वतीने साजरा करण्यात आला आहे, या वेळी, जहीर बिल्डर, शेख समीर, सैय्यद आरेफ, सागर ठाकुर, वैभव, आमेर मिर्ज़ा, इमरान मणियार, आकाश श्रीरामवार, हफ़ीज़ कुरेशी, महेबुब बागवान यांची उपस्थिती होती.

# बीड बसस्थानकावर अश्लील वर्तन करणारा न्ययायालयीन शिपाई तडकाफडकी निलंबित

**लोकनायक वृत्तसेवा -** (जि.मा.का.) बीड न्यायालयातील शिपाई शंकर अंबादास किरवले याने दि. २१ एप्रिल २०२५ रोजी बीड येथील बसस्थानकात महिलांकडे पाहून अश्लिल कृत्य केल्याबाबतचे वृत्त विविध वर्तमानपत्रामध्ये प्रकाशित झाले होते.शंकर अंबादास किरवले, शिपाई यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन शिवाजी नगर बीड येथे गु.र.न २३२/२०२५ कलम ७९,७५ (१) (४) भा.न्या संहिता २०२३ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून सदर गुन्हयातील प्रथम खबरी

अहवाल व इतर कागदपत्रे जिल्हा न्यायालयास प्राप्त झाली असून शंकर अंबादास किरवले याचे कृत्य हे अशोभनिय असल्यामुळे शंकर अंबादास किरवले, शिपाई याला तात्काळ निलंबित करण्यात आले असून त्याच्या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही सुरु करण्यात येत आहे, असे अधिकृत सुत्रा कडून समजले.






Loknayak 26.04.2025_Copy of Layout 1 4/25/2025 11:39 PM Page 2



# राजेवाडी तलाव प्रश्नी मुख्यमंत्री ना . देवेंद्र फडणवीस यांनी घेतली दखल


## आ. सदाभाऊ खोत यांच्या पत्रावरून दिला आदेश

### मुख्यमंत्री,आ. सदाभाऊ खोत व अन्य लोकप्रतिनिधींचे होत आहे अभिनंदन

### ५ खासदार, १२ आमदार महोदयांनीही राजेवाडी प्रश्नी दिले समर्थन



**लोकनायक वृत्तसेवा** – राजेवाडी तलावाच्या अनुषंगाने १४० वर्षापासून आटपाडी तालुक्यावर झालेल्या अन्यायाच्या पार्श्वभूमीवर माजी मंत्री, आमदार सदाभाऊ खोत यांनी मुख्यमंत्री ना . देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या पत्रावरून मुख्यमंत्री महोदयांनी, जलसंपदा विभागाचे राज्याचे अप्पर मुख्य सचिवांना तपासून कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत.आटपाडीचे ज्येष्ट पत्रकार, शेतकरी साहित्य इर्जिक परिषदेचे प्रदेशचे उपाध्यक्ष सादिकभाई खाटीक यांनी राजेवाडी तलाव प्रश्नी, आमदार सदाभाऊ खोत यांच्यासह राज्यातील अनेक आमदार, खासदार महोदयांचे लक्ष वेधले होते.आमदार सदाभाऊ खोत यांनी दि . २३ एप्रील रोजी, मुख्यमंत्री ना . श्री . देवेंद्र फडणवीस यांना भेटून दिलेल्या पत्रात, १८७६ साली उभारलेला ३ टीएमसी क्षमतेचा हा म्हसवड तलाव ( म्हसवड ता . माण जि . सातारा ), सांगली जिल्ह्यातील आटपाडी तालुक्याच्या ज्या राजेवाडी गावात उभा आहे, ते राजेवाडी गाव , नावापासून आणि बहुतांश आटपाडी तालुका १४० वर्षापासून पाण्याअभावी वंचित आहे . हे मोठे दुर्देव आहे.म्हसवड मध्यम प्रकल्पाचे नाव शासन दरबारी राजेवाडी तलाव असे केले जावे . फलटण (सातारा ) येथील या तलावाचे मुख्य व्यवस्थापन, सांगली जिल्हा जलसंपदाकडे दिले जावे . पंढरपूर ( सोलापूर ) येथील उपविभागीय कार्यालय, आटपाडी ( सांगली ) येथे सुरु केले जावे . महुद ( सांगोला, सोलापूर ) येथील शाखा कार्यालया बरोबर राजेवाडी (आटपाडी ) येथेही शाखा कार्यालय व्हावे.राजेवाडी तल-ावाला नवा कॅनॉल काढून या कॅनॉलला आटपाडी तालुक्यातील सर्व तलाव जोडले जावेत . उरमोडी अथवा निरेच्या पाण्याने राजेवाडी तलाव



आमदार सदाभाऊ खोत
सदस्य, महाराष्ट्र विधान परिषद
संस्थापक, रयत क्रांती संघटना, महाराष्ट्र राज्य
माजी राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र विधानपरिषद

जावक क्र.: SK/M/77/ 2025

दिनांक: 07/04/2025

प्रति,
मा.ना.श्री . देवेंद्रजी फडणवीस साहेब
मुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य

मुख्यमंत्री सचिवालय
दिनांक :- 23/4/25
ई. ऑफिस क्र. 8239728

विषय : सांगली जिल्ह्याच्या आटपाडी तालुक्यातील राजेवाडी गावातल्या म्हसवड तलावाच्या अनुषंगाने आटपाडी तालुक्यावर होत असलेल्या अन्यायाबाबत....

महोदय,

१८७६ साली उभारलेला ३ टीएमसी क्षमतेचा हा म्हसवड तलाव ( म्हसवड ता . माण जि . सातारा ), सांगली जिल्ह्यातील आटपाडी तालुक्याच्या ज्या राजेवाडी गावात उभा आहे, ते राजेवाडी गाव, नावापासून आणि बहुतांश आटपाडी तालुका १४० वर्षापासून पाण्याअभावी वंचित आहे, हे मोठे दुर्दैव आहे.

म्हसवड मध्यम प्रकल्पाचे नाव शासन दरबारी राजेवाडी तलाव असे केले जावे. फलटण (सातारा ) येथील या तलावाचे मुख्य व्यवस्थापन, सांगली जिल्हा जलसंपदाकडे दिले जावे. पंढरपूर ( सोलापूर ) येथील उपविभागीय कार्यालय, आटपाडी ( सांगली ) येथे सुरु केले जावे. महुद ( सांगोला, सोलापूर ) येथील शाखा कार्यालया बरोबर राजेवाडी (आटपाडी ) येथेही शाखा कार्यालय व्हावे. राजेवाडी तलावाला नवा कॅनॉल काढून या कॅनॉल ला आटपाडी तालुक्यातील सर्व तलाव जोडले जावेत. उरमोडी अथवा निरेच्या पाण्याने राजेवाडी तलाव बारमाही करावा, अश्या अनेक मागण्या प्रलंबित आहेत.

या लक्षवेधी मागण्यांच्या अनुषंगाने योग्य तो निर्णय करावा, अशी आपणास विनंती करीत आहे.

आपला नम्र
सदाभाऊ खोत

मुख्यमंत्री
महाराष्ट्र राज्य

माहितीसाठी प्रत
सादिक पापामियाँ खाटीक,
ज्येष्ट पत्रकार (आटपाडी जि. सांगली)

कार्यालय पत्ता: एस.के. इंटरनॅशनल सैनिक स्कुल, पेठ- शिराळा रोड, रेठरे धरण, ता. वाळवा, जि. सांगली ४१५ ४०७.
• मोबा.: ८९०८८ ४४१६१ • ईमेल :sadabhau123@gmail.com

बारमाही करावा . या लक्षवेधी न्याय मागण्यांच्या अनुषंगाने राज्य शासनाने योग्य तो निर्णय सत्वर करावा . अशी विनंती केली आहे . या पत्रावरच मुख्यमंत्री महोदयांकडून आदेश दिले गेले आहेत .राजेवाडी प्रश्नी राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षा खा . सुप्रियाताई सुळे बारामती , खा . विशालदादा पाटील सांगली, खा . अमोल कोल्हे शिरूर पुणे , खा . अमर काळे वर्धा, माजी मंत्री, खा . फौजिया खान राज्यसभा सदस्य, परभणी, हे ५ खासदार महोदयांनी तसेच माजी मंत्री, आमदार सुरेशभाऊ खाडे मिरज , आ . धनंजय उर्फ सुधीर गाडगीळ सांगली , आ. सुहास बाबर खानापूर , आ . गोपीचंद पडळकर जत, आ . रोहीत आर . आर . आबा पाटील तासगांव – कवठेमहंकाळ, माजी मंत्री, आ . विश्वजीत कदम पलुस कडेगांव, आ . इद्रिस नायकवडी मिरज , आ . उत्तमराव जानकर माळशिरस, आ . जयंत आसगांवकर कोल्हापूर, आ . बापूसाहेब पठारे वडगांव – शेरी पुणे, आ . अभिजित पाटील माढा या ११ विद्यमान लोकप्रतिनिधीं सह एबीपी माझा मराठी न्युज चॅनेल मुंबईचे मुख्य संपादक राजीव खांडेकर, श्रमिक मुक्ती दलाचे प्रणेते डॉ . भारत पाटणकर कासेगांव , माजी आमदार राजेंद्रआण्णा देशमुख खानापूर – आटपाडी , जि . प . माजी अध्यक्ष अमरसिंहबापू देशमुख



आटपाडी , दै . जनप्रवास चे संपादक संजय भोकरे सांगली, इत्यादी मान्यवरांनी राजेवाडी प्रश्नी समर्थन दिले असून मुख्यमंत्री महोदयांना खास पत्रे ही पाठविली आहेत.अप्पर मुख्य सचिव यांनी, पाहणीसाठी राजेवाडीला यावे वस्तुस्थिती जाणून घ्यावी, काय बदल अपेक्षित आहेत, यावर लोकमत जाणून घ्यावे व लोकप्रतिनिधी, संघटना, शेतकऱ्यांना प्रत्यक्ष भेटून समस्या समजून घ्यावी. आणि वस्तुनिष्ट अहवाल मुख्यमंत्री महोदयांना सादर करावा अशी जनतेची मागणी आहे.

# सावधान !पृथ्वी मानवजाती के लिये मेहमान है, मालक नहीं

पृथ्वीचा दीवसेंदीवस ह्रास होत आहे आणि यामुळे ऑक्सि-सजनची मात्रा सुध्दा कमी होत आहे ही घटना करोना महामारीच्या रूपाने आपण उघडल्या डोळ्यांनी पहाली. यामुळे जगात लाखोच्या संख्येने जिवीत हानी सुध्दा झाली.याकरीता पृथ्वीला वा-चवाण्यासाठी सर्वांनी संकल्पकरण्याची गरज आहे.आज बदलत्या हवामानामुळे दिनांक २० एप्रिल २०२५ ला देशात नागपूरची सर्वात हॉट शहरांमध्ये नोंद करण्यात आली.कारण नागपूरचा पारा ४४.७ अंश डिग्री सेल्सियस ने संपूर्ण विदर्भ होरपळून निघाला.जगात पृथ्वी सुरक्षित रहावी या उद्देशाने १९७० पासून जागतिक पृथ्वी दीवससाजरा करण्यात येतो.प्लास्टीक पासुन होणारे प्रदुषण व पृथ्वीला निर्माण होणारा धोका यावर मोठ्या प्रमाणात कार्यक्रम राबविण्यात आले व अनेक देशांनी प्लास्टीक पासुन होणारे प्रदुषण टाळण्याचा प्रयत्न केला व अनेक देश प्लास्टीकच्या प्रदुषणापासुन मुक्त झाले.भारतानेही पृथ्वी संरक्षणासाठी व प्रदुषण दुर करण्यासाठी प्लास्टीकवर बंदी घातली आहे. सध्याच्या परीस्थितीत जगातील वाढती लोकसंख्या पृथ्वीतलावरील मोठे संकट आहे. यामुळे हवेतील ऑक्सिजनची मात्रा दिवसेंदिवस कमी होतांना दिसुन येते. कारण जगातील वाढत्या लोकसंख्येमुळे जंगलसंपदा छीन्न-विछीन्न झाल्याचे दीसुन येते व यामुळे हवामान अक्राळविक्राळ रूप धारण करीत आहे.त्याचप्रमाणे अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात मोठ्या प्रमाणात कारखाने दीसुन येतात.यामुळे संपूर्ण जगात स्थ-लप्रदुषण,वायुप्रदूषण व जलप्रदूषण मोठ्या प्रमाणात होतांना दिसते. कारखान्यांचा विस्तार जगातील सर्वच देशांनी वाढविला आहे. यामुळे पहीला प्रहार जंगलसंपत्तीवर केलेला आहे. मानवाच्या अतिरेकामुळे पृथ्वीतलावर भुकंप,ज्वालामुखीचा उद्रेक,सुनामी, महाप्रलय, महामारी,साथीचे रोग,अती पाउस,अती उष्णता,अती थंडी,वनवे लागने अशाप्रकारचे विनाशाकडे नेणाऱ्या घटना दीवसेंदीवस वाढतांना दीसत आहे.ह्या संपूर्ण घटना मानवाने पृथ्वीवर अत्याचार केल्यामुळे दीसुन येतात. २१ व्या शतकात मानव इतका सामोरं गेला आहे की अनेक टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून अत्याधुनिक हतियार,अनुबॉम्ब बनविण्याच्या शर्यती लागलेला आहेत.आतातर बायोवेपन्स म्हणजे जैविक हतीयार बनविण्याची शर्यत लागली आहे आणि याही पुढे जाऊन पुढील युद्ध द्रोणच्या सहाय्याने लढले जात आहे.यामुळे पृथ्वी तहस-नहस होवू शकते.आज संपूर्ण जग उत्पादन वाढविण्यासाठी जैविक खतांचा मोठ्या प्रमाणात वापर करीत आहेत यामुळे पृथ्वीतील शक्ती व ऑक्सिजनची मात्रा दिवसेंदिवस कमी होतांना दिसते.सध्याच्या परीस्थितीत चिन जैविक हतीयार बनविणारा देश बनलेला आहे.चिन असा देश बनला आहे की तो नेहमीच जैविक हतीयाराचे वेगवेगळे परीक्षण करीत असतो.२०१९ मध्ये चिनने कोरोणा व्हायरसचे परीक्षण करून मानवजातीसोबत खुनी तांडव केल्याचे दिसून आले.आज संपूर्ण जग पृथ्वीला वाचविण्यासाठी प्रयत्न करीत आहे तर चिन पृथ्वीचा सर्वनाश करतांना दिसतो.आज मानवाने जंगल संपत्तीची हत्या केल्यामुळे नदी-नाले,तलाव, विहिरी मोठ्या प्रमाणात आटलेले दीसतात.यामुळे दीवसेंदीवस पृथ्वीच्या तापमानात वाढ होत आहे व हवामानात मोठ्या प्रमाणात बदल झाल्याचे दिसुन येते.त्याचप्रमाणे ग्लोबल वॉर्मिगमुळे सुध्दा पृथ्वीचे संतुलन डगमगायला लागले आहे.पृथ्वीवरील जंगलसंपदा कमी झाल्यामुळे व छोटे-मोठे तलाव आटल्यामुळे हिंसक पशु व जंगलातील इतर पशू (वाघ,बिबट्या,अस्वल,हरीण,बंदर) यांना जंगलात योग्य आहार व पाणी मिळत नसल्यामुळे शहराकडे धाव घेतांना दीसतात हा अत्यंत चिंतेचा आणि गंभीर विषय आहे.अशा अनेक कारणांमुळे पृथ्वीचा ह्रास होत आहे व जंगली प्राण्यांचा जिवन धोक्यात आलेले आहे.यावर उपाय शोधण्यासाठी जागतिक स्तरावर अनेक योजना राबविल्या जातात.त्यातुनच १९७० मध्ये विंसकॉन्सिन सीनेटर गेलॉर्ड नेल्सन यांनी २२ एप्रिल हा जागतिक पृथ्वी दीवस साजरा करण्याची संकल्पना साकार केली आणि तेव्हापासून २२ एप्रिल हा जागतिक पृथ्वी दीवस म्हणुन साजरा केल्या जातो. आज जगात २०० हुन अधिक देश आहेत या देशांच्या तुलनेत लोकसंख्येचा विचार केला तर १००० कोटींच्या वर लोकसंख्या आहे.त्यामुळे संपूर्ण देशांनी पृथ्वीला वाचविण्याच्या उद्देशाने २२ एप्रिलला प्रत्येक व्यक्तीने एकतरी झाड लावायला पाहिजे. कारण आपण उघड्या डोळ्यांनी करोना महामारीच्या काळात ऑक्सिजनचा तुटवडा पहाला आहे.परंतु नैसर्गिक ऑक्सिजन टिकवून ठेवण्यासाठी जंगल वा-चवीले पाहिजे, वृक्षारोपण केले पाहिजे,ज्यांच्या परीसरात जागा नसेल अशांनी एखाद्या कुंडलीमध्ये तरी झाड लावुन पृथ्वी दीवस साजरा करायला पाहिजे.त्याचप्रमाणे जंगल तोडीमुळे जंगलातील प्राणी शहराकडे भटकतात त्यांच्यासाठी जगातील संपूर्ण देशांनी जंगलामध्ये छोटे-छोटे तलाव बांधुन जंगली प्राण्यांचे प्राण वा-चवुन संगोपन करायला हवे.कारण मानवाच्या अनेक चुकांमुळे अनेक जंगली पशु-पक्षी व महत्त्वपूर्ण औषधीयुक्त वृक्ष लुप्त होत आहे.या पृथ्वीतलावर प्रत्येक प्राण्याचे व वृक्षांचे असणे आवश्यक आहे.कारण प्रत्येक पशु-पक्षी एकमेकांवर अवलंबून असतो त्याचप्रमाणे प्रत्येक वृक्ष महत्व-ाची भुमिका बजावीत असते.जगातील गिधाड हा पक्षी अत्यंत महत्त्वाची भुमिका बजावीत असतो.मेलेल्या प्राण्यांचे मांस खाणे गिधाडांचे काम असते.त्यामुळे अशुद्ध परीसर शुद्ध होतो. परंतु दु:खाची बाब ही की वायुप्रदूषण व जलप्रदूषण यामुळे गिधाडांची संख्या नाहीच्या बरोबरीत दीसते.त्यामुळे पृथ्वीवर मान-वजातीचे असने जेवढे महत्त्वाचे आहे तेवढेच जंगलातील संपूर्ण पशु-पक्षी यांचे सुध्दा जिवन तेवढेच महत्त्वाचे आहे. तेव्हाच पृथ्वी सुरक्षीत राहील.मान-वजातीने स्वत:च्या स्वार्थापोटी पृथ्वीची राखरांगोळी केली आहे.पुढे चालुन महाभयानक परीणाम सर्वांनाच भोगावे लागतील. आता इजरायल-हमास-इराण संघर्ष, अमेरिका-इराण संघर्ष व रशिया-युक्रेन संघर्ष यामुळे तिसऱ्या महायुद्धाचे संकट पृथ्वीवर ओढवल्याचे दिसून येते.आज मानवजातीने पुर्वेपासुन तर पश्रि्चम पर्यंत उत्तर पासुन तर दक्षिण पर्यंत,आकाश-पाताळा या संपूर्ण ठीकाणी मोठ्या प्रमाणात प्रदुषणाचे जाळे पसरविले आहे.यामुळे आज पृथ्वी माता सुध्दा भयभीत आणि चिंतेत आहे म्हणूनच आज आपल्याला कृत्रिम ऑक्सिजनची गरज भासत आहे.आज मानवाची रक्षा करण्याकरीता पृथ्वीला वाचविण्याचा संकल्प जगातील संपूर्ण राष्ट्रांनी घ्यायला पाहिजे.आज वृक्षलागवडच पृथ्वीला वाचवु शकते.कारण आज जगात जंगलांचे संगोपन होत नसल्याने मोठ्या प्रमाणात वनवे लागतांना दिसतात व यामुळे मोठ्या प्रमाणात जंगल संपदा नष्ट होत आहे.त्याचप्रमाणे देशात व जगात दिवसेंदिवस आगीच्या सुध्दा घटना मोठ्या प्रमाणात वाढत आहे.याचे मुख्य कारण म्हणजे वाढते तापमान यामुळे पृथ्वीचे संतुलन डगमगत आहे हे नक्की.याला कुठेतरी थांबवायला पाहिजे. वृक्ष लागवडीमुळे पावसाचे पाणी जमीनीमध्ये मुरेल व पावसाचे पाणी सरळ समुद्र किंवा नद्यामध्ये न जाता पृथ्वीच्या पोटात जाईल.यामुळे जमिनीतील पाण्याची पातळी वाढण्यास मोठी मदत मिळेल व उष्णतेचे प्रमाण कमी होईल.यामुळे विहीरी, तलाव व नदी-नाले,ओढे नेहमी जलमग्न राहील.आज मानवाने पाण्यासाठी सरळ पाताळात प्रवेश केला आहे.म्हणजेच आज मानवाने पाण्यासाठी जमिच्या आत ७०० फुट खोलवर जाऊन बोरवेलच्या सहाय्याने आपण देवलोकातील (पाताळातील) पाणी शोषीत आहोत.मानवाची जमीनीतील पाण्याची क्षमता फक्त ५० ते ६० फुटांपर्यंत आहे.परंतु मानवाचा अतिरेक हा विध्वंसाकडे किंवा विनाशाकडे न्यायला काहीच वेळ लागणार नाही.कारण मानवाच्या हातात सर्वच काही आहे.परंतु मानवाला अजुन पर्यंत निसर्गावर नियंत्रण ठेवता आले नाही. नैसर्गिक

## पान १ वरून

**अधिकाऱ्यांचा सत्कार...**

काम करत असताना पन्नास रुपयांच्या वरील कोणतीही वस्तू भेट घेत असताना ती शासनाला कळवणे गरजेचे आहे. या वस्तूंमध्ये सत्काराचे साहित्य वगळून, असे लिहिलेले नाही. आम्ही अनेक अधिकारी सत्कार स्वीकारत नाहीत, हे पाहिलेले आहे.त्यामुळे दोनशे, पाचशे आणि हजार रुपयांचा बुके तुम्ही कसा स्वीकारता ? हा देखील प्रश्न उपस्थित होतो. त्यामुळे जनतेला आमचे आवाहन आहे की, अधिकाऱ्यांचा सत्कार करू नका. प्रायोगिक पातळीवर बदलून जाणारा अधिकारी नवीन अधिकाऱ्याचा प्रातिनिधिक स्वरूपात सत्कार करत असतो. तोच सत्कार जिल्हा वासियांतर्फे झाल्याचे समजले जावे. अधिकाऱ्यांनी देखील आपल्या सत्कारावर बंधन आणावे, असेही अँड. अजित देशमुख यांनी म्हटले आहे.

**माजलगावात आणखी...**

को-ऑप सोसायटी लि. माजलगाव या संस्थेचे संचालक मंडळ यांचा समावेश आहे.तर माजलगाव येथील अन्य दोघांनी जिल्हा बीड संस्थेत तारण अस-लेली मालमत्ता बनावट दस्ताऐवजा आधारे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याशी संगनमत करून संस्थेच्या अनेक मालमत्ता खरेदी केल्याचे उघड झाले. त्यावरून या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**गोदावरी नदीपात्रातून वाळ...**

श्री आशिष खांडेकर करीत आहे सदरची कार्यवाही मा.पोलीस अधिक्षक श्री अजय कुमार बंसल सो,मा.अप्पर पोलीस अधीक्षक श्री आयुष नोपाणी, उपविभागीय पोलिस अधिकारी श्री विशाल खांबे सो, यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि.श्री आशिष खांडेकर,पी.एस.आय.शेख,पो-हेकॉ.केंद्रे,पोकॉ.वाहाब शेख यांनी केली आहे.

**मौजे कोठाळा येथ...**

जलसंधारणाची कामे हाती घेण्याचा निर्णय घेऊन मोफत मिळणाऱ्या पोकलेन मशीन मध्ये डिझेल टाकून ओढ्याचे खो-लीकरण, रुंदीकरण तसेच फुटलेला ओढा काळ्यामातीने बांध टाकणे अशा कामाचे एकजुटीने ठराव घेऊन प्रत्यक्ष कामाला ही सुरुवात करण्यात आले सरपंच भरत त्रिंबक गुळवणे यांनी समस्त महाजन ट्रस्ट चे आभार व्यक्त केले यावेळी गावातील ज्येष्ठ नागरिक ग्रामपंचायत सदस्य श्रीनिवास नाना उगले,श्री श्रीमंत दादा गुळवने, शिवाजी हरिचंद्र उगले, सामाजिक कार्यकर्ते श्री अनिल डवले,श्री देवा चित्राल, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक श्री संजय जाधव,श्री सुधाकर शिंदे,श्री बाळकृष्ण आंधळे,श्री सयाजी डावकर,श्री अमोल केंडे आदीची उपस्थिती होती.

**पहलगाम दुर्घटनेतील जखमी...**

आणि आवश्यकतेनुसार रुग्णालयात भरती यासह सेवा दिल्या जाणार आहेत. तसेच याच रुग्णालयांमध्ये रात्री ४ ते सकाळी ९ या वेळेत तणाव, निद्रानाश, अस्वस्थता, घटना पुन्हा अनुभवण्याची भावना यासाठी आपत्कालीन समुपदेशन व औषधोपचाराची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.हितगुज या आत्महत्येच्या प्रतिबंधासाठीच्या ०२२-२४१३१२१२ या दूरध्वनी हेल्पलाइनचा वापर करून सकाळी ९ ते दुपारी ४ पर्यंत तज्ज्ञ समुपदेशक मानसिक लक्षणांची तपासणी करतील व आवश्यकतेनुसार रुग्णालयात पाठवण्यात येईल.

## पान ४ वरून

**पहलगाम येथे झालेल्या...**

कारवाई तर करावीच परंतु देशाच्या सुरक्षिततेसाठी उपाय योजना देखील करायला हव्यात. या दहशतवादी हल्ल्यात मरण पावलेल्या सर्व भारतीयांना बीड तालुका काँग्रेस कमिटी व शिवक्रांती युवा परिषदेच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करत त्यांच्या कुटुंबीयांना या दुःखातून सावरण्याचे बळ परमेश्वर देवो असेही गणेश बजगुडे पाटील यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

**वाळूअभावी घरकुले रखडली...**

संदर्भात मा. जिल्हाधिकारी साहेब जालना, उपविभागीय अधिकारी साहेब अंबड, तह-सीलदार साहेब अंबड, गट विकास अधिकारी साहेब, पं.समिती अंबड यांना दिनांक०४/०३/२०२५ रोजी लेखी निवेदन दिले होते,परंतु त्या निवेदनाच्या अनुषंगाने आजप-ावेतो कोणत्याही लाभार्थ्यास वाळू उपलब्ध झालेली नाही. वाळू अभावी घरकुल्याची कामे रखडली असून ते मुदतीच्या आत होणे आवश्यक आहे, वाळू मिळाल्यास लाभार्थी वाळूचा वाहतूक खर्च नियमाप्रमाणे स्वतः करण्यास तयार आहे, मा. उपविभागीय अधिकारी साहेब यांनी या अर्जाच्या अनुषंगाने शासनाच्या धोरणानुसार लाभार्थ्यास वाळू उपलब्ध करून द्यावी अशी मागणी निवेदनाद्वारे भालगाव येथील लाभार्थ्यांनी केली असून उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या वतीने अव्वल कारकून पी.एम कोमटवार यांनी निवेदन स्वीकारले आहे.घरकुल बांधकामासाठी वाळू मिळाली नाही तर दिनांक ३०/०४/२०२५ रोजी लोकशाही मार्गाने उपविभागीय विभागीय कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने आमरण उप-ोषण करण्यात येईल आणि याची सर्वस्वी जबाबदारी आपली व उप विभागीय कार्यालयाची राहील असा इशारा निवेदनाच्या शेवटी देण्यात आला.या निवेदनावर गजानन पांडुरंग पुरी, विजय साबळे,भगवान खंडागळे, हरी मुळे, ऋषिकेश मुळे, नारायण भाकरे,ऋषी इंगळे,गणेश रामा जाधव, गणेश भगवान जाधव, सोमनाथ इंगळे,सोमनाथ लेंभे, दत्ता मुळे, आदि गावकऱ्यांच्यासह्या आहेत.

**चंपावतीरत्न पुरस्काराचे...**

समाजासाठी असलेली त्यांची तळमळ वाया जाऊ नये म्हणून एआयएमआयएम पक्षाचे तत्कालीन जिल्हाध्यक्ष शेख निजाम यांनी त्यांना विनंती करून पक्षात यायचे निमंत्रण दिले. रेड्डी साहेबांना या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार बॅरिस्टर अल्हाज असदुद्दीन ओवैसी यांचे परखड विचार आवडायचे त्यात निजाम यांनी दिलेल्या निमंत्रणामुळे त्यांनी एआयएमआयएम पक्षात निधन होण्याच्या काही वर्षांपूर्वी पक्ष प्रवक्ता म्हणून प्रवेश केला होता. तिथेही त्यांनी आपल्या सडेतोड आणि परखड भाषणांनी मैदान मारले होते. त्यांच्या या खुबीमुळे अल्पावधीतच ते बीड शहराप-ासून ते जिल्हाभरात आणि जिल्ह्यापासून ते हैदराबाद पर्यंत नावाजले गेले होते. एकीकडे त्यांची वाटचाल अशी सुरू असताना दुसरीकडे समाजातील प्रत्येक क्षेत्रात समाजोपयोगी कार्य करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचे कार्य समाजासमोर यावे, त्यांच्या चांगल्या कार्याचा समाजाला परिचय व्हावा, त्यांच्या पाठीवर समाजाच्या कौतुकाची थाप पडावी. या दृष्टिकोनातून ते चांगले कार्य करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांना दरवर्षी चंपाव-तीरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करायचे. विशेष म्हणजे या चंपावतीरत्न पुरस्कारासाठी त्यांच्याकडे कोणाचीही शिफारस किंवा पैसा चालायचा नाही. समाजात वावरताना ते स्वतःच ज्याला पुरस्कार द्यायचे आहे, त्याच्यावर नजर ठेवून त्याची पारख करायचे. स्वतःचे समाधान झाल्यावरच ते अशा व्यक्तीला चंपावतीरत्न पुरस्कार द्यायचे. चार वर्षांपूर्वी त्यांचे निधन झाल्याने चंपावतीरत्न पुरस्कार सोहळा थांबला आहे. हा पुरस्कार सोहळा बंद होऊ नये. निदान या पुरस्कार सोहळ्यानिमित्ताने तरी हॅरिसन फ्रान्सिस रेड्डी यांचे स्मरण समाजात सदैव रहावे. समाजात चांगले कार्य करणाऱ्यांचे या पुरस्काराच्या माध्यमातून कौतुक व्हावे म्हणून चंपावतीरत्न या पुरस्काराचे 'हॅरिसन फ्रान्सिस रेड्डी चंपावतीरत्न पुरस्कार' असे नामविस्तार करून ते दरवर्षी रेड्डी साहेबांच्या जयंती किंवा पुण्यतिथी दिना दिवशी वितरित करण्यात यावे. यासाठी तळमळीच्या सामाजिक संघटनांनी पुढे यावे. असे आवाहन मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी केले आहे.

**योगेश्वरी शिक्षण संस्था ...**

पतसंस्था ५० वर्षाच्या अविरत सेवेच्या उंबरठ्यावर आहे. यो-गेश्वरी शिक्षण संस्था कर्मचारी पतसंस्थेने आजपर्यंत सभासदांसाठी हिताचे निर्णय घेऊन या पतसंस्थेच्या माध्यमातून अनेक सभासदांचे गृह कर्ज, मुलांचे लग्नकार्य, तसेच मुलांच्या शिक्षणाचा खर्च या पतसंस्थेच्या माध्यमातून आवरत पूर्तता केली आहे. ही पतसंस्था कॅशलेस असून या पतसंस्थेने आजतागायत आपली वेगळी ओळख कायम ठेवली आहे. योगेश्वरी शिक्षण संस्था अंतर्गत सेवानिवृत्त तसेच नोकरीत असलेल्या सभासदांच्या दृढ विश्वासावर ही पतसंस्था मार्गक्रमण करत आहे.आजच्या युगात आवश्यक असलेल्या तसेच घरबसल्या सर्व सभासदांना आपल्या पतसंस्थेतील व्यवहारांची माहिती तसेच ठेवी व कर्जे याबाबतची माहिती मिळावी. तसेच कॅशलेस बरोबर पेपरलेस व्यवहारासाठी पतसंस्थेने एक पाऊल पुढे टाकत पतसंस्थेच्या सर्व सभासदांसाठी मोबाईल प्लिकेशन ची सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्धार व्यक्त केला व त्याला मूर्त स्वरूप देऊन सभासदांच्या सेवेत सर्व सभासदांना प्रशिक्षण देऊन या मोबाईल एप्लीकेशनचा शुभारंभ योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर तसेच सचिव श्री.कमलाकर चौसाळकर, कोषाध्यक्ष डॉ. शैलेश वैद्य आदी मान्यवरांच्या हस्ते व पतसंस्थेचे सर्व पदाधिकारी संचालक मंडळ व सभासदांच्या उपस्थितीत होणार असल्याची माहिती योगेश्वरी शिक्षण संस्था कर्मचारी पतसंस्थेचे अध्यक्ष बालासाहेब मसने व सर्व पदाधिकारी, संचालकांच्या वतीने देण्यात आली.

लोकनायक
शनिवार दि. २६ एप्रिल २०२५
३

# सीना-कुकडी कालव्याच्या आवर्तनासाठी आमदार रोहित पवार यांचा पुढाकार

## रविवार पासून सीना कालव्याचे आवर्तन सुरु करण्याचे आश्वासन

**लोकनायक वृत्तसेवा –** कर्जत-जामखेड मतदारसंघातील शेतकऱ्यांना वेळेवर पाणी मिळावे, यासाठी आज आमदार रोहित पवार यांनी मतदारसंघातील शेतकरी व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले, पुणे कुकडी सिंचन मंडळाचे अधीक्षक अभियंता संतोष सांगळे , मुख्य अभियंता हेमंत धुमाळ यांच्यासोबत पुण्यात सिंचन भवन येथे बैठक घेतली आणि सीना व कुकडी कालव्यांच्या उन्हाळी आवर्तनावर सविस्तर चर्चा केली. या बैठकीत रविवारपासून (दि.२७ एप्रिल ) सीना कालव्याचे पुर्ण दाबाने आवर्तन सुरू करण्याचा निर्णय झाला असून कुकडीबाबतही तातडीने निर्णय घेण्याचं आश्वासन देण्यात आले आहे. दरम्यान यासंदर्भात उद्या (शनिवार दि.२६ एप्रिल ) सीना मध्यम प्रकल्पाच्या कालवा सल्लागार समितीची बैठक होणार आहे.मतदारसंघातील सिंचनाच्या पाण्याबाबत शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन आमदार रोहित पवार हे नेहमीच पाठपुरावा करत असतात. कर्जत-जामखेड मतदारसंघातील सीना आणि कुकडी कालवा हा महत्त्वाचा असून मतदारसंघातील अनेक गावांमधील शेती या कालव्यावर अवलंबून आहे. ही गावे शेतीसोबतच पिण्याच्या पाण्यासाठीही सर्वस्वी कुकडी, सीना व घोड कालव्याच्या पाण्यावर अवलंबून आहेत. सध्या उन्हाची तीव्रता खूप वाढल्याने पाण्याची पातळी खालावली आहे परिणामी वेळेत पाणी न मिळाल्यास चारा पिके, फळबागा आणि उन्हाळी हंगामातील इतर पिकांचे मोठे नुकसान होणार आहे. तसेच अनेक गावांमध्ये पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर आमदार रोहित पवार यांच्या माध्यमातून महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या कार्यकारी संचालकांसोबत मतदारसंघातील शेतकरी व पदाधिकाऱ्यांची आज बैठक घेण्यात आली. कुकडी कालव्याबाबत कर्जत तालुक्यातील २५ भूसंपादन प्रस्तावांसाठी ४५ कोटी १८ लाख रुपयांची मागणी असून, हे प्रस्ताव लवकर मार्गी लावण्याची विनंती यावेळी बैठकीत आमदार रोहित पवार यांनी केली. तसेच चारी दुरुस्ती, कोळवडी

> आजच्या बैठकीत सीना कालव्यातून रविवारी (ता. २७ एप्रिल) आवर्तन सोडण्याचा निर्णय झाला. तसंच कुकडी कालव्यातूनही लवकरात लवकर आवर्तन सोडण्यासाठी मंत्रीमहोदय आणि अधिकारी यांच्याकडंही पाठपुरावा सुरु आहे. त्यानुसार कालवा सल्लागार समितीची बैठक होणार असून यामध्ये त्याबाबतचे आदेश देण्यात येणार आहेत. याशिवाय शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत पाणी पोचण्यासाठी आवर्तनाची मुदत ४० दिवसांची करण्याची मागणीही यावेळी केली.
>
> रोहित पवार
> आमदार,कर्जत-जामखेड




विभागातील प्रलंबित भूसंपादनाची कामे, प्रत्येक शाखा कालव्याच्या तोंडावर स्वयंचलित गेज मीटर बसवणे, आवश्यक त्या ठिकाणी कालव्यांचे अस्तरीकरण त्वरित पूर्ण करणे यासह सीना प्रकल्पांशी संबधित प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्यासंदर्भात बैठकीत सविस्तर चर्चा झाली.मागच्या वेळी कमी दाबाने आवर्तन सोडल्यामुळे मतदारसंघातील करमनवाडी, बारडगाव दगडी, तळवडी, पिंपळवाडी, पाटेवाडी, निमगाव डाकू, दिघी, चौंडी, थेरवडी तलाव व कोपर्डी तलाव या भागांमध्ये पाणी पोहोचले नव्हते. त्यामुळे लाभक्षेत्रातील सर्वांनाच पाणी मिळावे यासाठी हेड टु टेल पर्यंत पाणी पोहचणे गरजेचे आहे. त्यासाठी पुर्ण दाबाने आवर्तन सोडवण्याची आग्रही मागणी आमदार रोहित पवार यांनी बैठकीत मांडली.

# बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भीम जलसा कार्यक्रम थाटात संपन्न

**लोकनायक वृत्तसेवा –** परतूर तालुक्यातील गोळेगाव येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त आंबेडकरी भीम जलसा कार्यक्रम नुकताच संपन्न झाला.दि. २४ एप्रिल रोजी सदरील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते सकाळी ठीक १०:०० वाजता ध्वजारोहण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली दुपारी ०४:३० वाजता डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला आष्टी पोलीस ठाण्याचे प्रभारी सपोनी गणेश सुरवसे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून मिरवणूकीची सुरुवात करण्यात येऊन गावातील मुख्य रस्त्याने मिरवणूक काढण्यात आली,मिरवणूक विसर्जना नंतर रात्री ०८:३० वाजता भिमाची वाघीण फेम प्रा.प्रिती भालेराव यांचा




आंबेडकरी जलसा हा बहारदार भीमगीतांचा कार्यक्रम साजरा झाला,या कार्यक्रमात उपस्थितामध्ये मोठ्या प्रमाणावर उत्साह दिसून आला यावेळी गावातील सर्वच समाजातील नागरिक मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते सदरील कार्यक्रम ऐकण्यासाठी परिसरातील आंबेडकरी अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते,कार्यक्रमास आष्टी पोलीस ठाण्याचे पोलीस जमादार गायके,पो हे कॉ राणा पांढरे गावचे सरपंच उद्धव डोळस,पोलीस पाटील बबन डोळस,तसेच समता सैनिक दलाचे जवान देखील उपस्थित होते,कार्यक्रम यशस्वीतेसाठी जयंती कमिटीचे अध्यक्ष शरद डोळस,अजय प्रधान,विशाल प्रधान,राजेभाऊ प्रधान,राजेभाऊ डोळस,अमोल खरात,ऋतिक डोळस,सिद्धार्थ डोळस,महादेव डोळस,अंकुश प्रधान,प्रवीण डोळस,बंडू डोळस,मिलिंद प्रधान आदींनी परिश्रम घेतले.

# पहलगाम आंतकवादी हल्ला निषेध प्रकरणी आज सर्व पक्षीय लोहा बंद

**लोकनायक वृत्तसेवा –** जम्मू काश्मीर येथील पहलगाम मध्ये आतकवाद्यांनी धर्म विचारून केलेल्या हल्ल्यात पंचवीसहून अधिक पर्यटकांची हत्या केली त्या निषेधार्थ लोहा शहरात आज शनिवारी ( ता २६ ) सर्व पक्षीय बंदची हाक देण्यात आली असून तसे निवेदन तहसीलदार यांना देण्यात आले आहे .व्यापारी व जनतेनी बंद मध्ये सहभागी व्हावे व शांततेत बंदपाळावा असे आवाहन सर्वपक्षीय नेत्यांनी व्यापाऱ्यांनी केले आहे. पहलगाम (काश्मीर) येथे




आतकवाद्यांनी अंधाधुंद गोळीबार करुन पर्यटकांची निर्घृण हत्या केली।.त्यांना धर्म विचारला .या अमानवीय घटने नंतर देशभरात असंतोष पसरला आहे .या घटनेच्या तीव्र निषेधार्थ आज शनिवारी सर्व पक्षीय लोहा बंदचे आवाहन करण्यात आले आहे. सर्व व्यापारी बंधु, सर्व असोसिएशन व सर्व शाळा, ट्युशन व सर्वच लोहा बंद मध्ये सहभागी होऊन बंद यशस्वी करावा असे आवाहन सर्वपक्षीय नेत्यांनी केले आहे तसे निवेदन तहसीलदार यांना देण्यात आले आहे यावेळी माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, भाजपाचे उत्तर मंडळाध्यक्ष शरद पवार, कॉंग्रेस।पक्षाचे माजी शिक्षण सभापती संजय पाटील कऱ्हाळे ,शिवसेना उबाठा सुरेश हिलाल, शिक्षक नेते हरिभाऊ चव्हाण, मारुती पाटील बोरगावकर, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष नामदेव कटकमवार,लोहा आर्य वैश्य समाजाचे अध्यक्ष दिनेश तेललवार, राम पाटील सुधाकर पाटील यासह कार्यकर्ते उपस्थित होते

# ग्रामस्थांच्या मदतीने मशाल फेरी आयोजित करुन प्रकल्पाची जनजागृती

**लोकनायक वृत्तसेवा –** घनसावंगी तालुक्यातील कोठाळा बु.गावाची नानाजी देशमुख कृषी संजीवनी (पोकरा) प्रकल्प टप्पा -२ मध्ये निवड झाली असून गावात पाण्याच्या ताळेबंदानुसार मृदा व जलसंधारणाची कामे करण्यासाठी संरक्षित सिंचन, पाण्याचा वापर, शेतीमाल प्रक्रिया उद्योग, वैयक्तिक लाभाच्या योजना आदींबाबतचे नियोजन करण्यासाठी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी , गहिनाथ कापसे, उपविभागीय कृषी अधिकारी राम रोडगे आणि तालुका कृषी अधिकारी डॉ.सखाराम पवळ यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी




विभागामार्फत लोकसहभागीय सूक्ष्म नियोजन प्रक्रियेचे आयोजन करण्यात आले. सदर उपक्रमांतर्गत कृषी सहायक किरण घादगिने यांनी दि २४/५/ रोजी संध्याकाळी गावामध्ये ग्रामस्थांच्या मदतीने मशाल फेरी आयोजित करुन प्रकल्पाची जनजागृती केली, त्यानंतर ग्रामस्थांची बैठक घेऊन प्रकल्पांतर्गत असलेल्या योजनांची विस्तृत माहिती दिली तसेच सूक्ष्म नियोजन आराखडा तयार करण्यासाठी करावयाचे नियोजन बाबत चर्चा केली. त्यानंतर सकाळी, प्रभात फेरी,गाव नकाशा काढून हवामान अनुकूल तंत्रज्ञान लक्ष गट चर्चाच्या माध्यमातून गावाची असलेली संसाधने व प्रकल्पांतर्गत करावयाची कामे यावर चर्चा करण्यात आली अशा पद्धतीने.श्रमदान, शिवार फेरी , विहीर पाहणी,माती परीक्षण, महिला सभा,असे चार दिवस उपक्रम घेऊन गावचा आराखडा तयार करण्यात येणार आहे, त्यानंतर त्याला ग्रामसभेची मजुरी घेण्यात येणार आहे, या वेळी ग्राम कृषी विकास समिती चे सदस्य, सहदेव साबळे, सूर्यभान साबळे, दत्ता साबळे, शंकर साबळे, लक्ष्मण साबळे, विठ्ठल साबळे, सोमेश्वर साबळे,तुकाराम साबळे, मच्छिंद्र साबळे, कल्याण साबळे, माऊली साबळे, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# १५० वर्षाची परंपरा असलेला श्री.पापदंडेश्वराचा पालखी सोहळा सायंकाळी, उद्या महाआरती

**लोकनायक वृत्तसेवा –** तालुक्यातील गाढे पिंपळगाव येथे १५२ वर्षांची परंपरा असलेला ग्रामदैवत श्री.पापदंडेश्वर पालखी सोहळ्यानिमित्त शुक्रवारी (ता.२५) सायंकाळी १२ वाजता सुरुवात होणार असून शनिवारी (ता.२६) दुपारी १ वाजता महाआरतीने संपन्न होणार आहे. या सोहळ्यास पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.दिडशे वर्षांची परंपरा असलेला श्री.पापदंडेश्वर पालखी सोहळ्या



निमित्त शुक्रवारी पासून अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व शिव कथेचा प्रारंभ झाला. या हरिनाम सप्ताहात किर्तन, भजन, काकडा,गाथा भजन आदि संपन्न झाले. शुक्रवारी सकाळी अंकिता माने यांच्या शिवकथेचा समारोप झाला, दुपारी वासू देवानंद महाराज टाकळीकर यांच्या काल्याच्या किर्तनाने अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता करण्यात आली तर मुख्य पालखी सोहळा शुक्रवारी रात्री १२ वाजता श्री.पापदंडेश्वर मंदिरातून निघणार असून रात्री पालखी मार्गावर भारुडे, शनिवारी सकाळी गवळणी, सोंगे व दुपारी महाआरती नंतर महाप्रसाद आयोजित करण्यात आला आहे. या पालखी सोहळ्यास व अखंड हरिनाम सप्ताहास पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन गावकऱ्यांनी केले आहे.

# युपीएससीत यश मिळविलेल्या अक्षयचा भगवानबाबा विद्यालय पांगरी कँप येथे सत्कार

**लोकनायक वृत्तसेवा –** पांगरी कँप येथील श्री संत भगवानबाबा प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाचा माजी विद्यार्थी अक्षय मुंडे याने यूपीएससीची परीक्षेत ६९९ रँक घेत मिळवले यश मिळविल्याबद्दल शाळेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष फुलचंदराव कराड यांच्या मार्गदर्शनाखाली सत्कार करण्यात आला.अक्षय च्या घरची परिस्थिती अत्यंत बेताची.त्यात वडिलांचे छत्र बालपणीच हरवलेले अशा प्रतिकुल परिस्थितीत परळी तालुक्यातील पांगरी चा अक्षय संभाजी मुंडे हा गावातील संत भगवानबाबा विद्यालयातून दहावी उत्तीर्ण झाला. बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर त्याने बीडीएस ही वैद्यकीय शाखेची पदवी घेतली.आपल्या आईचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी स्पर्धा परीक्षांसाठी तयारी सुरू केली.पुणे येथून दोन वर्षांपूर्वी तो नवी दिल्ली येथे गेला व स्पर्धा परीक्षांसाठी त्या ठिकाणी योग्य असे मार्गदर्शन मिळवत त्याने प्रचंड मेहनत सुरू ठेवली. यूपीएससीच्या परीक्षेत त्याने ६९९ वी रँक मिळवत विजयाची माळ खेचून आणली. त्याच्या ह्या उत्तुंग यशाबद्दल त्याचा श्री संत भगवानबाबा प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात शुक्रवार दि.२५ एप्रिल रोजी सत्कार करण्यात आला.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय कोपनर,शिक्षक रंगनाथ घुले,सुर्यकांत होळंबे,संदीपान कांदे,विष्णु मुंडे, गोविंद कराड,सुरेश मुंडे, बालासाहेब जोगदंड,नाथराव केंद्रे,संभाजी केंद्रे,भाऊसाहेब मुंडे,सचिन पवार,सिध्दार्थ बनसोडे,रघुनाथ चप्पे,धनराज चाटे,धम्मपाल रोडे,रुक्मिण शेप,बापु मुंडे,सचिन बारगजे आदी उपस्थित होते.

# भारतीय सैन्य पाकिस्तानला नक्की धडा शिकवेल - माजीमंत्री आ.बबनराव लोणीकर

**लोकनायक वृत्तसेवा –** जम्मू-काश्मीर मधील पहलगाम या ठिकाणी पाकिस्तानच्या दहशतवादी संघटनांकडून काल भीषण दहशतवादी हल्ला करण्यात आला. पर्यटकांना त्यांचा धर्म विचारून दहशतवाद्यांनी गोळ्या झाडल्या. जम्मू-काश्मीरमधील अलीकडच्या काळात झालेला हा सर्वात भीषण दहशतवादी हल्ला आहे. २६ पर्यटकांचा या दहशतवादी



हल्ल्यात मृत्यू झाला आहे. पहलगाम हे काश्मीरमधील पर्यटन स्थळ आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी गृहमंत्री शहा यांनी याबाबत कठोर भूमिका घेऊन पाकिस्तानला नेस्तनाबूत करण्यासाठी ठोस पावले उचलणे गरजेचे आहे. भारत सरकारच्या वतीने भारतीय सैन्याला आपले निर्णय स्वतः घेण्याची पूर्ण मुभा दिलेली आहेच परंतु याहीपेक्षा कठोरातील कठोर भूमिका घेऊन अतिरेक्यांना आणि पाकिस्तानला अद्दल घडवण्याची हीच वेळ आहे. भारत सर्व दृष्टिकोनातून सक्षम असून या अतिरेकी हल्ल्याचा भारताकडून नक्कीच सर्जिकल स्ट्राइक सारखे उत्तर मिळेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी देशाचे गृहमंत्री अमित शहा आणि भारतीय सैन्यावर देशभक्त भारतीयांचा १००% विश्वास आहे. असे मत आमदार बबनराव लोणकर यांनी व्यक्त केले आहे.

बीडचा
महाराष्ट्राचा महानायक
लोकनायक
४
शनिवार दि. २६ एप्रिल २०२५

**सुचना**

दैनिक **लोकनायक** वृत्त पत्रातुन प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी यासंबधी व्यवहार करावा. जाहीरातीत आपल्या उत्पादन व सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात. त्यांची लोकनायक वृत्तपत्र समुह कोणतीही हामी घेत नसुन केलेल्या दाव्याची पुर्तता. जाहिरातदाराकडुन न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दल लोकनांयक वृत्तपत्र समुह जवाबदार राहणार नाही. याची कृपया सन्माननिय वाचकांनी नोंद घ्यावी.

– संपादक

# झेंडा लावण्यावरून खडकतमध्ये दोन गट आमने-सामने

**लोकनायक वृत्तसेवा –** आष्टी तालुक्यातील खडकत मधील चौकात झेंडा लावण्यावरून आणि काढण्यावरून कालपासून दोन गट आमने-सामने आले आहेत. काल तहसीलदारांच्या उपस्थितीत झेंडा काढला गेला मात्र आज गावाबाहेरून शंभर ते दोनशे लोक खडकतमध्ये आले आणि पुन्हा गावात तणावाचे वातावरण निर्माण होत दोन गटात मारामार्याही झाल्या. घटनेची माहिती कळताच आष्टी, पाटोदा, अंमळनेर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी तेथील तणाव निवळला असला तरी गाव कडकडीत बंद आहे. या प्रकरणी रात्री शंभर ते दीडशे जणांवर जमावबंदीचा आदेश धुडकावल्यासह अन्य कलमाखाली गुन्हा दाखल आहे. आज चिघळलेल्या







वातावरणात दोषींवर कारवाई केली जाणार असल्याचे सांगण्यात येते. सध्या गावात तणावाचे वातावरण आहे.आष्टी तालुक्यातील खडकत गावात एक चौक असून या चौकामध्ये सुरुवातीपासून एक झेंडा आहे. जयंतीदिनी अन्य एक झेंडा त्याठिकाणी लावण्यात आला. जयंती संपल्यानंतर तो झेंडा काढला जावा, असे काहींचे म्हणणे होते. यावरून काल दोन गट आमने-सामने आले. दोघांमध्ये वाद झाला. याची माहिती प्रशासनाला समजल्यानंतर घटनास्थळी पोलिसांसह तहसीलदार वैशाली पाटील या डेरेदाखल झाल्या. त्यांनी उपस्थित समाजासमोर एक झेंडा हटवला. या प्रकरणी रात्री शंभर ते दीडशे जणांवर जमावबंदी व लोकसेवकाचा आदेश न पाळल्याबाबत गुन्हाही दाखल झाला

मात्र रात्री पुन्हा गावाबाहेरून काही लोक खडकत या गावामध्ये दाखल झाले.आज सकाळी पुन्हा झेंड्यावरून दोन गट आमने-सामने आले. दोन गटात शाब्दीक चकमक होऊन हाणामारीचीही घटना घडल्याचे सांगण्यात येते. घटनास्थळी आष्टी, पाटोदा,अंमळनेर पोलीस डेरेदाखल आहेत.पोलिसांच्या अन्य दोन तुकड्याही त्याठिकाणी पाठवण्यात आल्या आहेत. सध्या गावात तणावपुर्ण वातावरण असून खडकत गाव कडकडीत बंद आहे.या प्रकरणी अद्याप कुणाला ताब्यात घेण्यात आलेले नसले तरी प्रशासनाने या घटनेचा व्हिडिओ काढलेला आहे. त्यांनुसार वाद निर्माण करणार्या दोन्ही गटातील लोकांवर गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगितले जाते

## पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा बीड तालुका काँग्रेस पक्षाकडून तीव्र निषेध

### मानवतेला काळीमा फासणारी घटना - गणेश बजगुडे पाटील


**लोकनायक वृत्तसेवा –** काश्मीर येथील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा बीड तालुका काँग्रेस व शिवक्रांती युवा परिषदेच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करत हा हल्ला अतिशय भ्याड व मानवतेला काळीमा फासणारा असुन हल्लेखोरांवर तत्काळ कठोरात कठोर कारवाई करण्याची मागणी काँग्रेसचे नेते व शिवक्रांती युवा परिषदेचे संस्थापक अध्यक्ष



गणेश दादा बजगुडे पाटील यांनी केले आहे.काश्मीर येथील पहलगाम येथे पाकिस्तानी दहशतवाद्यांनी २७ निरपराध भारतीय पर्यटकांवर गोळ्या झाडून हत्या केली. ही घटना अतिशय निंदनीय व मानवतेला काळीमा फासणारी असुन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी, गृहमंत्री अमित शहा यांनी यावर कठोरात कठोर भुमिका घेवुन ठोस उपाय योजना करायला हव्यात. जातीय धार्मिक तेढ निर्माण करून भ्याड हल्ले करणाऱ्यांवर सरकारने **पान २ वर**

## वाळूअभावी घरकुले रखडली, मोफत वाळू देण्याची लाभार्थ्यांची मागणी

**लोकनायक वृत्तसेवा –** महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार ग्रामीण भागातील,वस्तीवरील गोरगरीब जनतेला राहण्यासाठी पक्के घर मिळावे या उद्देशाने घरकुल लाभार्थ्यास पाच ब्रास वाळू मोफत दिली जाणार आहे असे शासनाने जाहीर केले होते; आणि त्याचा वाहतूक खर्च लाभार्थ्यास करावा लागणार आहे या अनुषंगाने भालगाव ता. अंबड येथे पंतप्रधान आवास योजना-१३२, रमाई आवास योजना-४२, शबरी आवास योजना -१०४,यशवंतराव



चव्हाण घरकुल योजना -९, एकूण सरासरी =३५०, घरकुले मंजूर झालेली आहेत, परंतु घरकुलाचे बांधकाम करण्यासाठी गोरगरीब लाभार्थ्यास वाळू उपलब्ध होत नसून आज रोजी बाजारात वाळूचे भाव गगनाला भिडलेले दिसून येतात. वाळू अभावी घरकुलाची बांधकामे रखडली आहे. घरकुल लाभार्थ्यास वाळू उपलब्ध करून देण्याच्या **पान २ वर**



राष्ट्रवादी काँगेस पार्टी जिल्हा अध्यक्ष व माजी आमदार अरविंद चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त मिर्ज़ा अनवर बेग मित्र परीव-राच्या वतीने साजरा करण्यात आला आहे, या वेळी, जहीर बिल्डर, शेख समीर, सैय्यद आरेफ, सागर ठाकुर, वैभव, आमेर मिर्ज़ा, इमरान मणियार, आकाश श्रीरामवार, हफीज़ कुरेशी, महेबुब बागवान यांची उपस्थिती होती.

## चंपावतीरत्न पुरस्काराचे नामविस्तार आणि आयोजनासाठी सामाजिक संघटनांनी पुढे यावे - एस.एम.युसूफ़

**लोकनायक वृत्तसेवा –** दिवंगत अजातशत्रू अवलिया हॅरिसन फ्रान्सिस रेड्डी यांच्याकडून देण्यात येणाऱ्या चंपावतीरत्न पुरस्काराचे त्यांच्या मृत्यू पश्चात हॅरिसन फ्रान्सिस रेड्डी चंपावतीरत्न पुरस्कार असे नामविस्तार करून ते वितरित करण्यासाठी सामाजिक संघटनांनी पुढे यावे असे आवाहन मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी केले आहे.याविषयी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे की, हॅरिसन फ्रान्सिस रेड्डी हे समज आल्यापासून सामाजिक चळवळींमध्ये सहभागी झाले होते. सत्ताधाऱ्यांनी घेतलेल्या समाजविरोधी निर्णयाचा ते सदैव कडाडून विरोध करत असायचे. यामुळे त्यांना डाव्या विचार-सरणीचा म्हणून ओळखले जायचे. तरुणपणी ते मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षात कॉम्रेड अतहर बाबर, सय्यद मोईनुद्दीन मास्टर, ड. उषा दराडे, प्रा. सुशीला मोराळे, नामदेवराव चव्हाण यांच्यासोबत अनेक वर्षे सक्रिय होते. यापैकी अतहर बाबर यांचे



अनेक वर्षांपूर्वी निधन झाले तर नामदेवराव चव्हाण वगळता इतरांनी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष सोडून इतर पक्षात प्रवेश केला. हे सर्वजण आजही राजकारणात सक्रिय आहेत. डाव्या पक्षातील या घडामोडी नंतर हॅरिसन फ्रान्सिस रेड्डी व्यथित झाले होते. म्हणून त्यांनीही मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष सोडून स्वतः समांतर काँग्रेस पक्षाची स्थापना केली होती. आज लोकांना आश्चर्य वाटेल रेड्डी साहेबांच्या याच समांतर काँग्रेस पार्टी मध्ये आष्टी-पाटोदा मतदार संघातून अनेकदा निवडून आलेले माजी आमदार भीमराव धोंडे सुद्धा होते. रेड्डी यांचे व्यक्तिमत्व असे होते की, त्यांना राजकीय वाटाघाटी जमत नसायच्या. ते सदैव आपल्या तत्त्वांवर, निश्चयावर ठाम राहायचे. यामुळे त्यांना या पक्षातून त्या पक्षात, त्या पक्षातून त्या पक्षात असे करणे कधीही जमले नाही. म्हणून ते एकटेच राहिले मात्र त्यांच्यातील परखड वक्ता **पान २ वर**

## योगेश्वरी शिक्षण संस्था कर्मचारी पतसंस्थेचे सभासदांसाठी मोबाईल अँप

### सोमवारी मान्यवरांच्या हस्ते अनावरण

**लोकनायक वृत्तसेवा –** योगेश्वरी शिक्षण संस्था कर्मचारी सहकारी पगारदार पतसंस्थेने सभासदांसाठी नवीन मोबाईल पचा शुभारंभ व प्रशिक्षण सोहळा सोमवार २८ एप्रिल रोजी यो-गेश्वरी महाविद्यालयाच्या नागा-पूरकर सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. योगेश्वरी शिक्षण संस्था कर्मचारी पतसंस्था ही पगारदार पतसंस्थांमध्ये मराठवाड्यात अग्रेसर पतसंस्था असून १९७७ साली स्वर्गीय प्राचार्य भ.की.सबनीस यांच्या प्रेरणेने योगेश्वरी संस्थेअंतर्गत सुरू झाली. पारदर्शक कारभार आणि सभासदांचे हित हेच ध्येय अंगी बांधून ही **पान २ वर**

हॉटेल जय महाराष्ट्र
शिवाजीनगर, बार्शी रोड, बीड
शाकाहारी व मांसाहारी उत्तम जेवण मिळण्याचे एकमेव ठिकाण
प्रो.नवनाथ शिराळे
मो.नं. ९४२२२४००६५
९८२२०७५९४५

प्रोप्रा.नरेंद्र करमाळकर
मो.नं.९४२०७९८९२९
निलेश करमाळकर
मो.नं.९८२२४४८८५२
Since1999
न्यु करमाळकर ज्वेलर्स
G.S.T.N. No.27BKAPK8972L2ZI
बुंदलेपुरा, अग्नीशामक रोड, बीड ४३११२२

प्रो.प्रा. सुजीत गुंजाळ 9975025031
॥ तुळजाभवानी प्रसन्न ॥
प्रो.प्रा.अभिजीत गायकवाड 9852551818
आम्ही घडवतो एक रंगीत विश्व...!
सत्यम ग्राफिक्स
बॅनर प्रिंटींग
स्टार प्रिंटींग
वनवे प्रिंटींग
विनायल प्रिंटींग
बॅक लाईट
१२ X १८ स्टिकर
सर्व प्रकारची डिझायनिंग व प्रिंटींग
सत्यम ग्राफिक्स,बीड.

अंकुश गायकवाड
मो.९८६०१४५४१२
सागर ग्लास
आमच्याकडे अल्युनियम विन्डो, पार्टीशन तयार करून मिळेल
नगर रोड, पंचायत समिती समोर बीड ४३११२२

This Newspaper Printed by Owner , Printer , Publisher Editor BHARAT DEVIDAS GAIKWAD,Sub Editor - Nayra Raj Muley Executive Editor - Abhijeet Gaikwad at Indradhanush Printers and publishers , Near Post Office , Peth Beed , Khadkpura, Beed 431122 ( Maharashtra ) and Published AT.The office of Dainik Loknayak , Near Post Office , Peth Beed , Khadkpura, Beed 431122 ( Maharashtra )

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक भारत देविदास गायकवाड, सहसंपादिका - नायरा राज मुळे. कार्यकारी-संपादक - अभिजीत गायकवाड यांनी इंद्रधनुष्य प्रिंटर्स ॲण्ड पब्लिशर्स, पोस्ट ऑफिसजवळ, पेठ बीड, खडकपुरा, बीड जि.बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक बीडचा लोकनायक कार्यालय, पोस्ट ऑफिसजवळ, पेठ बीड, खडकपुरा, बीड जि.बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. पी.आर.बी.कायद्यानुसार ( सर्व वादविवाद बीड न्याय कक्षेत) Mobile: 9850165082 E:mail : dainikloknayak@gmail.com